नवाकाळ
मंगळवार, १८ मार्च २००८
पान ४

मी काय बोलतोय...



# डॉ.रविराज अहिरराव

चित्रपटांची संख्या वाढली. वाहिन्यांचे युग सुरू झाले. नव्या संकल्पनेत अनेक नाटके रंगमंचावर दाखल झाली. म्हणून प्रेक्षकांची सांस्कृतिक भूक काही थांबलेली नाही. आजही नव्या संकल्पनेतील, नव्या आविष्कारातील आणि तेही प्रत्यक्ष सादर केल्या जाणाऱ्या कार्यक्रमांचे प्रेक्षक आवर्जून स्वागत करतात. काही वर्षांपूर्वी कथाकथन, मिमीक्री, नाट्यप्रवेश हे सर्व मनोरंजन करणारे अविष्कार एकपात्री प्रयोगाचा विषय होता. पण आता काळ बदलला, प्रेक्षक बदलले त्याप्रमाणे एकपात्री सादरकर्त्यांनी आपल्या अविष्कारातही आमूलाग्र बदल केलेला आहे. आरोग्यविषयक मार्गदर्शन, राशीभविष्य, ऐतिहासिक माहिती, क्रांतिकारकांचे जीवन, काव्यदर्शन हे विषयसुद्धा एकपात्री कार्यक्रमाचे आविष्कार होऊ शकतात. हे अनेकांनी आपल्या सादरीकरणात पटवून दिलेले आहे. यात आणखीन एका कार्यक्रमाची भर पडलेली आहे, ती म्हणजे वास्तुशास्त्राविषयी मनोरंजक पण आवश्यक संदर्भ देऊन केलेला कार्यक्रम रंगमंचावर दाखल झालेला आहे. डॉ.रविराज अहिरराव हे सादर करीत असलेल्या या अनोख्या कार्यक्रमाचे नाव आहे 'वास्तुरविराज'. या कार्यक्रमाने नुकताच आपला शतकमहोत्सवी प्रयोग मोठ्या दिमाखात साजरा केला. त्यानिमित्ताने रविराज यांच्याशी साधलेला सुसंवाद.

**वास्तुशास्त्रावर एकपात्री प्रयोगाची कल्पना कशी सुचली?**

*रुईया कॉलेजमधून बाहेर पडल्यानंतर मेडिकल रिप्रेझेंटेटीव्ह म्हणून मी काही वर्ष काम केले आणि यातूनच वास्तुशास्त्र काय आहे ते जाणून घेण्याची इच्छा निर्माण झाली. मुंबई विद्यापीठातून डिप्लोमा मॅनेजमेंट स्टडीज ही पदवी संपादन केली आणि आणखीनच वास्तुशास्त्राविषयी कुतूहल निर्माण झाले. त्याचा सखोल अभ्यास करता यावा, संशोधन केले जावे म्हणून ईशान्य आणि नैऋत्य दिशा, मानवी जीवन, महत्त्व आणि प्रभाव हा विषय घेऊन श्रीलंका युनिव्हर्सिटीतून पीएचडी ही पदवी संपादन केली. विविध थरातल्या अभ्यासू तसेच या विषयाची आवड असणाऱ्या व्यक्तींना करिअरच्या दृष्टीने मार्गदर्शन करत असताना जो सुसंवाद साधला जात होता त्यावरून या कार्यक्रमाची निर्मिती होऊ शकते, याची मला खात्री झाली. यापूर्वी अशा आगळ्यावेगळ्या विषयावर ज्यांनी एकपात्री कार्यक्रम सादर केले त्यांच्या प्रेरणेतून ही कल्पना पुढे आली आणि कोल्हापूरच्या नाट्यगृहात या कार्यक्रमाचा पहिला प्रयोग केला. ज्या पद्धतीने याला प्रेक्षकांची उपस्थिती लाभली त्यातून भविष्यातही हा कार्यक्रम करण्याचा निश्चय झाला.*

**शतक महोत्सवी प्रयोग कराल असे वाटले होते का?**

*प्रयोगाविषयी मी काही अंदाज बांधला नव्हता. पण एखादा कार्यक्रम थेट प्रेक्षकांपर्यंत पोहोचवायचा म्हणजे भरपूर जिद्द, चिकाटी ही तर असायलाच हवी, पण प्रेक्षकांना अपेक्षित, त्यांना विश्वासात घेणाऱ्या बऱ्याच गोष्टी सादरीकरणात असायला हव्यात यांची पुरेपूर जाणीव मला होती. वास्तुशास्त्राविषयी भारतीय प्रेक्षकांत कुतूहल आणि औचित्य आहे, पण कोणी मोकळ्या मनाने या विषयावर बोलायला मागत नाही. याविषयी बरेच गैरसमज आहेत. अशा शास्त्राचा अभ्यास करणे किंवा जाणून घेणे म्हणजे अंधश्रद्धेला महत्त्व देणे असाही काहीसा अर्थ लावला जात असला तरी लपूनछपून हा विषय जाणून घेणाऱ्या लोकांची संख्या मोठी आहे. त्यामुळे हा कार्यक्रम यशस्वी होईल, याची मला खात्री होती. हा वषय किचकट होऊ नये म्हणून काही प्रसंगानंतर प्रेक्षकांचे छान मनोरंजन करू शकेल, असे विनोदी किस्से या कार्यक्रमात सादर करतो. सध्या तरी या कार्यक्रमाचे अधिकाधिक प्रयोग होण्याच्या दृष्टीने मी स्वत: जास्त पुढाकार घेत आहे. भविष्यात संघटना, संस्थेच्यावतीने या 'वास्तुरविराज'चा कार्यक्रम होईल, असा मला विश्वास वाटतो.*

**पीएचडी श्रीलंकेतून मिळविण्याचे कारण काय?**

*भारत हा एकच देश सोडला तर बऱ्याचश्या देशांमध्ये या शास्त्राविषयी सरकारमध्ये जागृती पाहायला मिळते. काळाची गरज म्हणून या विषयाकडे पाहिले जाते. भारतात या विषयावर अभ्यासक्रम निर्माण व्हावा अशी तत्परता अद्याप तरी दिसंत नाही. कुठल्याही भारतीय युवकाला या विषयावर पीएचडी संपादन करायची झाली तर त्याला अन्य देशात हा प्रबंध सादर करावा लागतो. वास्तुशास्त्राची परंपरा भारतात ही आजची नाही, तर अनेक वर्षांपासून चालत आलेली आहे. त्याचे जतन आणि संवर्धन अभ्यासक्रमाच्या निमित्ताने जपले जावे, या दृष्टीने मी स्वत: शासन दरबारी भरपूर प्रयत्न केलेले आहेत. हे शास्त्र नव्या पिढीला समजून सांगेल असे विद्यापीठ उभारले जावे, असे मला प्रामाणिकपणे वाटते. राज्यकर्ते सत्तेवर आल्यानंतर आपल्या बंगल्यापासून ते कार्यालयापर्यंत सर्वच गोष्टींचे मूल्यमापन हे वास्तुशास्त्र नजरेसमोर ठेवून करत असतात. मी स्वत: अनेकांना या संदर्भात मार्गदर्शन केलेले आहे. ते त्यांना पटलेले आहे. पण फायलीच्या रूपाने ते जनतेच्या समोर यावे, असे त्यांना वाटत नाही. त्यामुळे मी स्वत:च माझ्या 'वास्तुशास्त्र एज्युकेशन रिसर्च फाउंडेशन' या संस्थेच्यावतीने हे कार्य करण्याचे ठरविलेले आहे. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी याविषयी क्लासेस सुरू केलेले आहेत. लेक्चरच्या निमित्ताने देश, परदेश प्रवास सुरू केलेला आहे. मिळणाऱ्या प्रतिसादाने स्वप्न आकार घेईल, असे मला वाटते.*

**डॉ.रविराज अहिरराव**